ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतीय विमा व्यवसाय सद्यस्थिती समस्या व उपाय योजना

**प्रा. डॉ. बी. एन. शिंगाडे[1], सिद्धार्थ विजय तळेकर[2]**

[1] *मार्गदर्शक*

[2] *संशोधक*

*संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर.*

***Corresponding Author:* प्रा. डॉ. बी. एन. शिंगाडे**

**DOI - 10.5281/zenodo.14885870**

**प्रस्तावना:**

निसर्गाने मानवासहित सर्व प्राण्यांना जाणिवेची देणगी बहाल केलेली आहे त्याद्वारे ते राहणे आपले संरक्षण करू शकतात. मानव हा समाजप्रिय असा प्राणी आहे. यासाठी मानव आपल्या स्वतःच्या रक्षणासाठी आपल्या प्रियजनांच्या हितासाठी व आपण घेतलेल्या भौतिक साधनांना सुरक्षितता लाभावी म्हणून सतत प्रयत्नशील असतो. मानवाच्या विकासाबरोबर विविध धोके आणि संकटे सुद्धा निर्माण झालेली आपल्याला दिसून येतात. मानवाच्या जीवन जगण्याच्या प्रक्रियेमध्ये व तो ज्या ठिकाणी कामधंदा करीत आहे त्या ठिकाणी महापूर, आग, भूकंप यासारखे देखील घटना घडू शकतात यासाठी तो वर्तमानातच उपाययोजना करण्याच्या प्रयत्नात असतो. आपल्या संपत्तीची मालमत्तेची किंवा आपल्या जीवाचा संकटापासून बचाव करण्याची हमी कोण देऊ शकेल या संकल्पनेतूनच विमा या संज्ञेचा उल्लेख झालेला आपल्याला दिसून येतो.

**अर्थ:**

विमा हा सामुदायिक एकतेचा एक उत्कृष्ट असा आविष्कार आहे. मानवाच्या जीवनात आपण धोके टाळू शकत नाही परंतु आपण त्या संकटांपासून संरक्षण करू शकतो. संरक्षण करणारी कोणती तरी संस्था असावी यातूनच विमा व्यवसायाचा उगम झालेला आपल्याला दिसून येतो. उद्योग संस्थांचे आग , पूर यातून होणारे नुकसान किंवा व्यक्तीचे अपघात किंवा अकाली निधन होणे यासाठी जी काही आर्थिक नुकसानीची भरपाई करण्याची शक्यता असणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी शोधलेल्या सामाजिक सहकार्याचा एक उत्कृष्ट मार्ग म्हणजे विमा होय.

**व्याख्या:**

विमा या संज्ञेची आणि तज्ञांनी व्याख्या केलेले आहे काही व्याख्या विमा कार्याच्या स्वरूपावर आधारित आहे तर काही विमा कराराच्या स्वरूपावर आधारित आहे त्यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

***करारावर आधारित व्याख्या:***

जस्टिन लॉरेन्स यांच्या मते विमा हा एक असा करार आहे की ज्या द्वारे एक पक्ष (विमा कंपनी) दुसऱ्या पक्षाने (विमदार) दिलेले योग्य मोबदल्याच्या बदल्यात दुसऱ्या पक्षास करारात नमूद केल्याप्रमाणे संभाव्य धोक्यापासून नुकसान पोहोचवल्यास त्याची भरपाई करण्याचे आश्वासन देते.

***कार्यात्मक व्याख्या:***

रॉक फेल यांच्यामध्ये विमा हे नुकसानाचे वाटप करण्याचे साधन आहे. यामध्ये काही लोकांचे नुकसान हे अनेक लोकांमध्ये वाटले जाते.

**संशोधन विषयाचे महत्व:**

मानवाच्या आयुष्यात भीती ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे भीतीमुळेच मानवाला संरक्षणाची गरज भासते. मानवाला खूप वेगवेगळ्या प्रकारची भीती वाटत असते. आज भूकंप झाला , माझ्या घराला आग लागली , मी ज्या कंपनीमध्ये काम करीत आहे ती कंपनी जर दिवाळखोर निघाली तर किंवा माझा गाडीवर चालताना अपघात झाला तर अशा वेगवेगळ्या जर दर्जा भीती मानवाच्या मनामध्ये दडलेल्या असतात. त्या भीतीमधूनच मानवाला संरक्षणाची गरज भासत असते.

विमा हा मानवाच्या भीतीवर मानवाने शोधलेला उपाय आहे. प्रत्येक मानवाची हीच प्रामाणिक इच्छा असते की माझे कमीत कमी नुकसान व्हावे व माझे जास्तीत जास्त हित साधले जावे. सध्याच्या 21व्या शतकामध्ये विमा ही एक खूप महत्त्वाची गोष्ट बनलेली आहे. कारण आजचे 21 वी शतक हे आधुनिक असे समजले जाते. त्याच बरोबर आधुनिक समाज असताना त्यामध्ये खूप गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होताना आपल्याला दिसतात त्यामुळेच विमा हा एक प्रत्येक मानवासाठी आवश्यक अशी बाब आहे.

आज जगामधील प्रत्येक मानवाला एक सुरक्षित असे जीवन जगावेसे वाटत आहे. कारण मानवाच्या मनामध्ये कुठेतरी एक वेगळ्याच प्रकारची अस्वस्थता आहे. मानवाच्या जीवनाचे अनिश्चितता हे एक तत्व आहे त्यामुळे मानवाला सुरक्षिततेची भावना आपली वाटते.

विमा हा मानवाला जोखीम घेण्याची हमी प्रदान करतो त्यामुळे विमा हा मानवासाठी एक जवळचा मित्र आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

कोणत्याही मानवी कार्यामध्ये काही ठराविक उद्दिष्टे ठरवणे आवश्यक असते. सामाजिक संशोधनामध्ये जर ते कार्य योग्य प्रकारे यशस्वी व्हा व्यासे जर आपल्याला वाटत असेल तर त्यासाठी योग्य उद्दिष्टे ठरवणे गरजेचे असते.सामाजिक संशोधन हे परिणामकारक होण्यासाठी योग्य उद्दिष्टे ठरवणे हे गरजेचे असते. या मधूनच सामाजिक संशोधनाचा पाया घातला जातो.

भारतीय विमा व्यवसाय सद्यस्थिती समस्या व उपाय योजना या विषयांमध्ये तर आवश्यक आहे की सर्वप्रथम योग्य उद्दिष्टे ठरविणे. उद्दिष्टे निश्चित केल्यानंतर त्याचा शोध निबंधाचा चिकित्सनात्मक अभ्यास करणे श्रेयस्कर ठरते. त्यासाठी मी खालील उद्दिष्टे निश्चित केली.

1. भारताच्या विमा व्यवसायाचा आढावा घेणे.
2. भारताच्या विमा व्यवसायाची सद्यस्थिती समजावून घेणे.
3. भारताच्या विमा व्यवसायातील समस्या व त्यांची कारणे शोधून काढणे.
4. भारताचा विमा व्यवसाय अधिक परिणामकारक होण्यासाठी त्यासाठी उपाययोजना सुचविणे.

या प्रकारे मी या शोधनिबंधासाठी उद्दिष्टे निश्चित केली.

**संशोधन पद्धती:**

संशोधन कार्यामध्ये संशोधन पद्धती खूप महत्त्वाची भूमिका आपल्याला बजावताना दिसून येत असते. भारतीय विमा व्यवसाय सद्यस्थिती समस्या व उपाय संशोधन पद्धती खूप मोलाची भूमिका बजावते. मी दुय्यम साधन सामग्रीचा वापर शोधनिबंधासाठी केलेला आहे त्यामध्ये विविध पुस्तके नियतकालिके वेबसाईट यांचा वापर केलेला आहे. युरोप, इंग्लंड, अमेरिका, देशांमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांती आणि

17 व्या शतकामध्ये समुद्रातील व्यापारचा परिणाम आहे. विमा हा ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जसे की भारत यासारख्या प्रदेशामध्ये ब्रिटिशांमुळे झालेला आहे. ट्रायटन इन्शुरन्स कंपनी(1850) लिमिटेड या कंपनीचे स्थापना केली. 1907 मध्ये इंडियन मर्केटाईल विमा कंपनीची स्थापना झाली. ही पहिली कंपनी होती जिने सामान्य विमा व्यवसायाला सर्व वर्गांसाठी देवाणघेवाण केली.1957 मध्ये जनरल इन्शुरन्स कौन्सिलची निर्मिती झाली जी भारतीय विमा संघाची एक शाखा आहे. 1972 मध्ये विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले आणि एक जानेवारी 1973 पासून सामान्य विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले. त्यामध्ये नॅशनल इन्शुरन्स कंपनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी आली इन्शुरन्स कंपनी लिमिटेड जनरल इन्शुरन्स ऑफ इंडिया १९७१ मध्ये कंपनीच्या रूपातील समाविष्ट केले गेले. भारतीय विमा क्षेत्राच्या इतिहासामध्ये सन 2000 मध्ये भारतातील विमा क्षेत्राला गती मिळाली. सध्या भारतामध्ये 24 जीवन विमा कंपनी आणि 30 नॉन लाइफ इन्शुरन्स कंपनी भारतातील विमा क्षेत्रावर राज्य गाजवत आहे. भारतामध्ये 2005 सून जवळपास 2015 पर्यंत अठरा वेगवेगळ्या खाजगी विमा कंपनी स्थापन झाले. त्यामध्ये रिलायन्स जनरल, कोटक महिंद्रा जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, अपोलो इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यासारख्या कंपन्या स्थापन झाल्या. 2000 नंतर भारतीय विमा क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणुकीची गुंतवणूक खूप मोठ्या प्रमाणात वाढले. विमा क्षेत्रामध्ये खाजगी भांडवलदार तसेच परकीय गुंतवणूकदार यामुळे विमा क्षेत्रामध्ये भ्रष्टाचाराचा खूप होत होता. त्यामुळे भारत सरकारने विमानियमक व विकास प्राधिकरण ची स्थापना (1999) मध्ये केली.

भारताची विमा क्षेत्र हे खूप मोठ्या प्रमाणात व मोठ्या आकारमानाने विकसित होत असलेले आपणास दिसून येते. आज खाजगी गुंतवणूकदार किंवा भारत सरकारच्या मालकीच्या विमा कंपन्या त्याबरोबरच ची बीपीएल कुटुंबी आहेत त्यांना प्रधानमंत्री रस्ते अपघात योजना किंवा पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना यासारखा लाभ मिळवून देण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील असलेले आपणास दिसून येते. भारतीय विमा व्यवसाय सद्यस्थितीत समस्या व उपाय योजना यामध्ये मी काहीही साधनांच्या आधारे याचे विश्लेषण करणार आहे.

| भारतीय | सर्वसाधारण | विमा | कंपन्या |
|---|---|---|---|
| वर्ष | सार्वजनिक | खाजगी | एकूण |
| 2000-01 | 5 | 3 | 8 |
| 2005-06 | 6 | 9 | 15 |
| 2010-11 | 6 | 17 | 23 |
| 2015-16 | 6 | 23 | 29 |
| | A | | |

A आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे भारतामध्ये खाजगी क्षेत्रातील विमा कंपन्यांची संख्या वाढत चालताना दिसून येत आहे. विमा क्षेत्रामध्ये खाजगी कंपन्यांचे प्रचंड स्पर्धा चालू आहे.

**IRDA ची भूमिका:**

1. विमा कंपन्यांना प्रमाणित करणे.
2. पॉलिसी धारकांच्या हिताचे रक्षण करणे.
3. विवादाची निवाडे करणे.
4. सर्वेक्षक आणि नुकसान मूल्यांकनकर्त्यांसाठी आचारसंहितेची निवड करणे

**IRDA चे ध्येय धोरण:**

- पॉलिसी धारकांच्या हिताचे रक्षण करणे आणि त्यांना योग्य वागणूक देणे
- अखंडता व्यवहारिक सुदृढता आणि ते नियमन करणाऱ्या सक्षमतेची उच्च मानके प्रस्थापित करणे त्यांना प्रोत्साहन देणे देखरेख करण्याआधी अंमलबजावणी करणे
- वास्तविक विवादाची जलद निपटारा सुनिश्चित करणे विमा फसवणूक आणि इतर गैरप्रकार रोखणे.
- उद्योगांचा दैनंदिन कामकाजात विवेक पूर्ण नियमांच्या आवश्यकतांची सुसंगत जास्तीत जास्त घडवून आणणे.

वरील घटकांचा समावेश मला या संशोधन पद्धतीमध्ये आढळून आले

**निष्कर्ष:**

भारतीय विमा व्यवसाय सद्यस्थिती समस्या व उपाययोजना या शोधनिबंधामध्ये मला काही खाली निष्कर्ष आढळून आलेले आहेत.ते मी पुढील घटकांचा आधार घेऊन स्पष्ट करू शकतो.

- भारतीय विमा व्यवसायाची वाढ ही प्रामुख्याने शहरी भागात होताना आढळून आली.
- भारतीय विमा व्यवसाय हा शहरी भागांमध्ये खूप वेगात सुरू असलेला व ग्रामीण भागामध्ये खूप कमी प्रमाणात असलेला असा व्यवसाय आहे ही एक या व्यवसायामध्ये खूप मोठी समस्या आहे
- सर्वसामान्य लोकांची विमा याबद्दल त्यांना जास्त जाणून घेण्याची उत्सुकता नाही व स्वतःचा जीवन विमा वगैरे उतरावयाण्याची त्यांच्यामध्ये एक उदासीनता मला आढळून आलेली आहे
- भारतीय विमा व्यवसायामध्ये खाजगी विमा उद्योग समूहांना खूप अडचणींचा सामना करावा लागत आहे त्यामध्ये काम करणारे कर्मचारी हे खूप तणावांमध्ये आयुष्य जगात असताना आपल्याला दिसून येते

**उपाययोजना:**

1. ग्रामीण भागामध्ये विम्याबद्दल लोक जागृती वाढवणे त्याद्वारे लोक जास्तीत जास्त आपल्या स्वतःचा मालमत्तेचा किंवा इतर संपत्तीचा विमा उतरा होतील
2. विमा काढणाऱ्या व्यक्तीला जर नुकसानीचा सामना करावा लागला तर विमा घेणाऱ्या उद्योग समूहाची तिची जबाबदारी आहे की आपले जो ग्राहक आहे. त्यास योग्य वेळी योग्य ती भरपाई करून देण्याची जबाबदारी आपण घ्यावी आपला जो ग्राहक आहे. त्याला कागदपत्रे मेंटल हर्यास्मेंट देऊ नये. ज्याद्वारे उद्योग समूहाला अधिकाधिक विमा प्राप्त होईल.

3. विम्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची हे मोबाईल वरती अपडेशन केवायसी किंवा इत्यादी कामेही संबंधित विमा उतरवणाऱ्या उद्योग संस्थेने करावीत ज्याद्वारे आपल्या ग्राहकाला खूप चांगला फायदा होईल व चांगली सेवा मिळेल
4. विम्याच्या ज्या काही अटी व शर्ती आहे आहेत त्या आपल्या ग्राहकांना खूप चांगल्या पद्धतीने समजावून सांगाव्यात

**संदर्भ ग्रंथ:**

1. शिवाजी विद्यापीठ, विमा, दूर शिक्षण केंद्र 2019 विद्यापीठ प्रकाशन
2. कोळंबे रंजन , भारतीय अर्थव्यवस्था (2021) भगीरथ प्रकाशन, पुणे
3. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता दर्पण (2023).
4. https//irdai.gov.in
5. https// www.hdfccergo.com
6. https//www.sbigeneral.in